पनवेल(प्रतिनिधी) क्रीडा शिक्षक व पर्यवेक्षक तसेच रात्रशाळेचे मुख्याध्यापक प्रा.संग्राम रोडगे यांच्या सेवानिवृत्ती निमित्त नुकताच शानदार सोहळा पार पडला.

सुधागड एज्युकेशन सोसायटी पाली या शैक्षणिक संस्थेच्या नविन पनवेल येथील के.आ.बांठिया माध्यमिक व एन.एन.पालीवाला उच्च माध्यमिक विद्यालयात कार्यरत असणारे क्रीडा शिक्षक व पर्यवेक्षक तसेच रात्रशाळेचे मुख्याध्यापक रायगड भूषण प्रा.संग्राम रोडगे हे नुकताच सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्त नविन पनवेलमधील के.आ.बांठिया माध्यमिक विद्यालयाच्या सभागृहात विद्यालयातील व कनिष्ठ महाविद्यालयातील आजी-माजी विद्यार्थी, खेळाडू, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, सहकारी व शुभचिंतकांतर्फे त्यांच्या सन्मानार्थ 'सेवापुर्ती गौरव समारंभ' आयोजित करण्यात आला होता. या समारंभात त्यांचा सपत्नीक सन्मान करण्यात आला.

यावेळी प्रा.रोडगे यांना पूढील वाटचालीकरिता शुभेच्छा देण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर, माजी नगराध्यक्ष मोतीलाल बांठिया, रायगड जिल्हा परिषदेतील कॉंग्रेसचे गटनेते राजेंद्र पाटील, नगरसेवक संदीप पाटील, माजी मुख्याध्यापक अे.बी.सुतार, मुख्याध्यापक डि.व्ही.पवार, मुख्याध्यापक पि.एल.गायकवाड, डि.डि.गायकवाड, ज्येष्ठ कवियत्री ललीता बांठिया, उद्योजक एकनाथ भोपी, डॉ.कुमार शिंदे, ॲड.नागेश हिरवे, पत्रकार राजेश खंडागळे, विलास भोपी, रविंद्र नाईक, स्मिता जुमलेदार, हनुमान म्हात्रे, प्रज्ञा पेंडसे, राजू आवळे, यांच्यासह आजी-माजी विद्यार्थी, शिक्षकवृंद, सहकारी, रोडगे सरांचे कुटूंबिय, आदी शुभचिंतक मोठया संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी के.आ.बांठिया माध्यमिक व एन.एन.पालीवाला उच्च माध्यमिक विद्यालयातील माजी मुख्याध्यापक व शिक्षकांचा स्मृतीचिन्ह देवून सन्मान करण्यात आला. यावेळी शिवशाहिर वैभव घरत प्रस्तुत 'आम्ही मराठी' या कार्यक्रमांतर्गत 'शिक्षणाचा कर्मयोगी हा आदर्श शिक्षक' हा पोवाडा सादर करण्यात आला.